# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २८७-२२ दिनांक २८/०९/२०२२

## प्रेसनोट

### वेश्यागमनातून अल्पवयीन व पिडीत मुलींची सुटका करुन महिला दलाल हिस अटक- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर पथकाची कामगिरी

दिनांक २७/०९/२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत अशी बातमी मिळाली की, महिला वेश्यादलाल नामे प्रिया (बदलले नाव) हिस पुरुष गिऱ्हाईकाने संपर्क साधला असता, ती व्हॉटसअॅपव्दारे पुरुष गिऱ्हाईकांना मुलींचे फोटो पाठवुन गिऱ्हाईकास लॉजमध्ये रुम बुक करावयास लावुन त्यांच्या पसंतीनुसार अल्पवयीन व इतर मुली पुरवून त्याबदल्यात वेश्यागमनाचा मोबदला घेत असते.

मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पो.नि. अविराज कुराडे यांनी पुर्तता करुन महिला वेश्या दलाल प्रिया हिने हॉटेल पार्क व्हु फॅमिली रेस्टॉरंट आणि बार, श्री लक्ष्मी पार्क, कनकिया रोड, गॅलक्सी हॉस्पिटलजवळ, मिरारोड (पुर्व) येथे पंचाच्या समक्ष बोगस गिऱ्हाईकास १ अल्पवयीन व इतर १ मुलगी दाखवुन त्याबदल्यात अल्पवयीन मुलीचा वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन ठरवलेली रक्कम १४,०००/- रु स्वीकारली असता तिला मुद्देमालासह दिनांक २७/०९/२०२२ रोजी १५.५० वा. ताब्यात घेण्यात आले. सदर कारवाईमध्ये १ अल्पवयीन व १ पिडित मुलगी अशा एकुण २ मुलींची सुटका करण्यात आली. सदरबाबत उमेश हरी पाटील, स.पो.उपनि. यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन वरील आरोपीतांविरुध्द मिरारोड पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. I ४०२/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३६६ (अ), ३७०(१)(४), ३७२ सह अ.व्या.प्रति.अधि. १९५६ चे कलम ४, ५ सह बालकाचे लैगिंक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम १७, १८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति. कार्यभार पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री. अविराज कुराडे, स.पो.नि. पुष्पराज सुर्वे, गुन्हे शाखा १, काशिमिरा, स.पो.उप.नि. उमेश पाटील, विजय निलंगे, पो.शि. केशव शिंदे, चालक पो.ना.०६१०६ गावडे नेम- अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर व म.पो.शि. शिरसाठ नेमणुक पो.उप.आयुक्त, गुन्हे कार्यालय यांनी केलेली आहे.

-------------oooo---------------